श्रम एवं जयते

**श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळ, उमरगा**

# आदर्श महाविद्यालय, उमरगा

## ता. उमरगा जि.धाराशिव

# अहवाल

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा

## 1 जाने 2025 ते 15 जाने 2025

## पंधरवाडा

**मार्गदर्शक**

## प्राचार्य, डॉ. दिलीप गरुड

**प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार**

**कार्यक्रमाधिकारी**

**प्रा. दत्तात्रय भुजबळ**

**प्रा. शरद कुलकर्णी**

**प्रा.डॉ. प्रशांत मोठे**

दि. 30.12.2024

# बैठकीचा अहवाल

महाराष्ट्र शासन आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या परिपत्रकानुसार आदर्श महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्र पंधरवाडा आयोजीत करण्यासाठी प्राचार्य डॉ. दिलप गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली खास स्वतंत्र बैठक आयोजीत करण्यात आली. या बाठकीमध्ये ग्रंथालय स्वच्छता, ग्रंथप्रदर्शन , ग्रंथदिंडी, व्याख्यान आयोजित करण्याचे ठरवण्यात आले या बैठकीसाठी महाविद्यालयातील बहुसंख्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होतो.

दि. 03.01.2025

दि. 30.12.2024 रोजी बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे दि. दि. 03.01.2025 पासून महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांना ग्रंथ, संदर्भग्रंथ वाचणाची आवड निर्माण करण्यासाठी मुला - मुलींना रिडींग रुममध्ये विविध पुस्तके देवून पुस्तक वाचन करण्यासाठी बसवण्यात आले. महाविद्यालयामध्ये विद्यापीठीय परीक्षा चालू असताना परीक्षा संपल्यानंतर पुस्तक वाचणासाठी बहुसंख्य मुला-मुलींनी चांगला प्रतिसाद दिला अनेकांनी कथा, कादंबरी, नाटके इ. विविध छोटया - छोटया पुस्तकांचे वाचन करुन त्या पुस्तकावर आपला अभिप्राय लिहून संबंधीत प्राध्यापकाकडे सुपुर्द केला.

दि. 04.01.2025

खरोखर आजच्या 21 व्या शतकामध्ये मोबाईल , गुगल, वॉटसप, इन्स्टाग्राम या साधनामुळे मुलांना हव ते नॉलेज थोटक्यात आणि कमी वेळेत मिळत असल्यामुळे मुलं दिवसेंदिवस क्रमीक पुस्तके कथा, कादंबरी , नाटके यांच्यापासुन दूर जात आहेत. जवळ जवळ वाचन हे आयुष्यात राहीलेल नाही ही चिंतेची बाब बनलेली आहे. टेस्ट बुक आणि रेफरन्स बुक्स यांच्यापासुन आजची पीढी दुरावलेली आहे. याची जानीव शासकीय स्तरावर झाल्यामुळेच वाचन संकल्प महाराष्ट्र ही योजना शासनाला विद्यापीठ आणि महाविद्यालयीन पातळीवर राबवणे गरजेचे वाटले म्हणून मोठया प्रमाणावर ही योजना राबवण्यासाठी दि. 4.01.2025 रोजी मुला - मुलींना महाविद्यालयाच्या रिडींग रुम मध्ये एकत्र करुन वाचनाची गोडी व महत्व त्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी प्रत्यक्ष वाचनासाठी ग्रंथ पुरवले व त्यांना बसवण्यात आले व अभिप्राय लिहून घेण्यात आला.

दि. 06.01.2025

दि. 02.01.2025 च्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे महाविद्यालयामध्ये विद्यापीठाच्या परीक्षा चालू असताना परीक्षेच्या वेळापासून आज दि. 06.01.2025 रोजी ज्युनियर आणि सिनियर च्या मुलांमुलीमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी इंडोअर  स्टेडीयममध्ये बहुसंख्य मुलांना एकत्रीत करुन वाचन करण्यासाठी पुस्तके पुरवण्यात आली आणि त्यानंतर त्या पुस्तकाविषयीचा सारांश त्यांच्याकडून लिहून घेण्यात आला. अंदाजे आज रोजी महाविद्यालया मधील 500 विद्यार्थी - विद्यार्थीनीनी  सहभाग नोदवला.

दि. 08.01.2025

दि. 08 जानेवारी 2025 रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या परीपत्रकातील योजनेनुसार महाविद्यालया मधील विद्यार्थी व विद्यार्थ्यीनी यांच्याकडून महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची साफसफाई करुन घेण्यात आली.

दि. 11.01.2025

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा व्याख्यान

महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये वाचनविषयीची गोडी आवड निर्माण व्हावी म्हणून आदर्श महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवाडा निमित्त प्राचार्य डॉ. दिलीप गरुड सरांचे वाचन : काल आज आणि उद्या या विषयाच्या अनुषंगाने व्याख्यान आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये प्रा. डॉ.लक्ष्मण बिराजदार यांनी जगभर मोबाईल क्रांतीमुळे वाचनाकडे पाट फिरवल्याची खंत व्यक्त करुन अनेक वर्तमानपत्रे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. वाचनाशिवाय ज्ञानाच्या विविध क्षेत्रातील संकल्पना स्पष्ट होत नाही विविध ग्रंथ वाचणाच्या माध्यमातून वाचन, चिंतन, मनन केले पाहिजे असे उपस्थितांना अवाहन केले.

प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. गरुड सरांनी मोबाईल , टिव्ही, गुगल, इंटरनेट, आर्टीफिशियन इंटीलीजन्स या माध्यमाव्दारे तात्पुरते ज्ञान आत्मसात करण्याच्या सवयीमुळे कमी वेळात हवे  ज्ञान मिळवण्याच्या सवलतीमुळे दिर्घकाळ वाचन संशोधन करण्याची सवय बदलली. वरील साधनामुळे वाचनाव्दारे मिळणारा आनंद , आत्मानंद, ब्रम्हानंद या आनंदापासून वाचक विद्यार्थी दुरावला आणि त्यांच्या स्वभावात बराच बदल घडून आला शांत आणि संयमाची जागे रागाने घेतली चिडचिडेपण वाढले मुले मानसिक विकृतीकडे वाटचाल करु लागले. किर्तन, व्याख्यान वाचन हे प्रत्यक्ष कानाने ऐकने आणि डोळयाने पाहिल्याने जसे परफेक्ट ध्यानात येते तसे किंवा त्याही पेक्षा वाचन हे सर्वात प्रभावी माध्यम आहे. वाचनामुळे मानसाच्या जसी ज्ञानात भर पडते तसे त्याचे व्यक्तीमत्वही प्रभावी बनते महाविद्यालयीन जिवनातील अनेक अनुभव कथन करुन मुलांनमध्ये वाचना विषयी व स्मरणशक्तीच्या क्षमता विकसीत करण्यासाठी मुलांना दररोज काहीतरी वाचन करण्याचा आग्रह केला.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रा.से.यो कार्यक्रमाधिकारी प्रा. दत्तात्रय भुजबळ यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. प्रशांत मोठे यांनी मानले.

दि. 13.01.2025

# ग्रंथप्रदर्शन

वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवाडा या कार्यक्रमाच्या आराखडयातील शेवटचा भाग महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागाने स्वतंत्र वाचणीय पुस्तकांचे ग्रंथप्रदर्शन प्रदर्शीत करावे असा आदेश प्राचार्य डॉ. गरुड सरांनी दिले होते त्याचाच एक भाग म्हणून दि. 13 जानेवारी 2025 रोजी महाविद्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शन प्रदर्शित करण्यात आले.

संस्थेच्या ज्यूनीयर सीनीयर, डी.एड, बी.एड, फार्मसी सर्व युनीटच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेतला. ग्रंथ प्रदर्शनामध्ये महाविद्यालयीन मुलांना आपल्याला कथा साहित्य कादंबरी नाटके अथवा ऐतिहासिक ग्रंथ वाचनासाठी हवा असल्यास आपल्याला हवे असलेले ग्रंथ वाचनासाठी दिले जातील असे अवाहन विद्यार्थी व विद्यार्थीनींना करण्यात आले. शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी आणि विद्यार्थीनीनी ग्रंथ प्रदर्शनामध्ये मोठया हिरीरीने उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला.